# आई माझी जवळची मैत्रीण!

आपण किती मोठे झालो, कितीही नाव कमवलं तरीही आईसाठी आपण तिचं बाळ असतो. आता कालानुरूप आई-मुलाच्या नात्याला मैत्रीची झालर प्राप्त झाली आहे. असंच काहीसं म्हणणं आहे; ज्येष्ठ अभिनेते-निर्माते-दिग्दर्शक सचिन पिळगांवकर यांचं. उद्या असलेल्या 'मदर्स डे'निमित्त त्यांनी आपल्या आईप्रती असलेल्या भावना व्यक्त केल्या.

**सचिन पिळगांवकर**, ज्येष्ठ अभिनेते

माझं पहिली गुरू माझी आई. आईसारखा दुसरा कोणताच गुरू नाही, ही भावना आजही कायम आहे आणि यापुढेही राहणार. मी अभिनयात करिअर करू नये, अशी आईची इच्छा होती. अनेकदा विनंती केल्यानंतर तिनं फक्त एका चित्रपटात काम करण्याची परवानगी दिली. जेव्हा 'हा माझा मार्ग एकला' (१९६३) या माझ्या पहिल्यावहिल्या चित्रपटातील कामासाठी मला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तेव्हा तिच्या डोळ्यांत आनंदाश्रू होते. तेव्हा आई म्हणाली, 'बाळा, तू याचसाठी जन्म घेतला आहेस, तू पुढे काम करत राहा'. जसं प्रत्येक आईचं असतं 'माझा तो बाबल्या' तसं माझ्या आईचं आजही आहे. ती माझी खूप जवळची मैत्रीण आहे. माझ्या आयुष्यातील अशी एकही गोष्ट नाही, जी तिला माहीत नाही. आता कालानुरूप आमच्यातील मैत्री अधिक घट्ट होत आहे.

काही दिवसांपूर्वी 'नवरा माझा नवसाचा २' या सिनेमाचं चित्रीकरण गणपतीपुळ्याला करत होतो, तेव्हा मी तिला माझ्यासोबत घेऊन गेलो होतो. तिची दगदग झाली, पण त्याहून अधिक तिला झालेला आनंद तिच्या चेहऱ्यावर दिसत होता. त्याचं मला समाधान आहे. आईचं वय ८५ वर्षांहून अधिक असलं तरी तिचे विचार पुरोगामी आणि व्यापक आहेत, ती नव्याचा सहज स्वीकार करते. ती ओटीटीवरील कन्टेंट पाहते, ती फेसबुक हाताळते. तिनं माझ्या लेकींची म्हणजे श्रियापी प्रत्येक सीरिज पाहिली आहे. त्या दोघींचं अतिशय गोड नातं आहे. आजी नातीच्या कामाचं भरभरून कौतुक करत असते आणि गप्पटेखील तिच्या आजीचे लाड करत असते. त्या दोघींमधील नातं बघून मी मनोमन सुखावते.

तिचे ऋण मी कधीच फेडू शकत नाही, हे जाणून आहे. ती कोणत्याही बाबतीत कुणावरही अवलंबून नाही, ही आमच्या घरातील वस्तुस्थिती आहे. आजही आम्ही तिच्याच घरात राहतो. एक खासगी गोष्ट सांगतो, ती कोणालाही सांगू नका, वयापेक्षा कमी दिसण्याची जादू मला तिच्याकडून अवगत झालीय. 'मदर्स डे' हा माझ्यासाठी वर्षातून एकदाच येणारा दिवस नाही. आईला माझ्याकडून खूप सारं प्रेम!

शब्दांकन : **शब्दुली कुलकर्णी**

# दूर देशी गेलो तरी...

जगाच्या पाठीवर कुठेही गेलो तरी 'आई'ची आठवण आल्याशिवाय राहत नाही. परदेशात शिक्षणानिमित्त गेल्यावर तिनं केलेल्या सूचना, तिच्या सवयी, तिचं 'असणं' आणि विशेषत: तिच्या हातचे पदार्थ हे सगळं काही मिस केलं जातं. उद्या असलेल्या 'मदर्स डे'निमित्त कलाकारांच्या परदेशी राहणाऱ्या मुलांनी आपल्या आईबद्दल मनोगत मांडलं.

## 'थ्रील'ची आठवण येते!

मला आणि आईला (मेघना जाधव) फिरायची आवड आहे. तिच्याबरोबर फिरणं खूप मिस करतो, कारण फिरताना आम्ही दोघं एकमेकांना नव्यानं कळत जातो, तेव्हा आमच्यात आई-मुलाचं नातं नसतं तर दोन जिवलग मित्र 'कनेक्ट' झालेले असतात. भारतात असताना आई मला नेहमी सांगायची, उठल्या-उठल्या आधी पांघरूणाची घडी घालावी. त्याचं महत्त्व आता दूर गेल्यावर कळतंय. आई इथे आली होती तेव्हा खूप लाडू घेऊन आली होती. त्या लाडवांच्या चवीची आठवण माझे इथले परदेशी मित्र-मैत्रीणही काढतात. दररोज रात्री जेवण झाल्यावर आईस्क्रीम, लस्सी किंवा मिठाई खाण्याचा आम्हा दोघांचा कार्यक्रम असायचा, ते आम्हा दोघांसाठी थ्रील असायचं. त्या गोष्टीची प्रकर्षानं आठवण येते. सध्या मी नोकरी शोधण्याच्या प्रक्रियेत आहे, या घडीला मला मानसिक आणि भावनिक पाठबळ द्यायला आई हवी होती, असं वाटतं.

– **अथर्व जाधव**

## तिचं माझ्यासोबत 'असणं' म्हणजे सुख

गेली दहा वर्षं मी परदेशात राहत आहे. मी आणि आई (निवेदिता सराफ) दोघं दररोज व्हिडीओ कॉलवर बोलतो. एखाद्या दिवशी बोलणं झालं नाही तर दुसऱ्या दिवशी तिचे दोन-तीन फोन होतात. तिची ऊर्जा मी मिस करतो. कामावरून दमून घरी आल्यावर आपल्याला आपला माणूस समोर लागतो, तेच मी तिचं असणं मिस करतो. तिनं बनवलेला प्रत्येक पदार्थ चविष्ट असतो, त्यातूनही निवडायचं झालं तर कोलंबी लोणचं आणि झटपट चिकन हे पदार्थ तिच्याशिवाय दुसरं कुणीच अप्रतिम बनवू शकत नाही. तसंच तिनं बनवलेल्या मोदकातल्या सारणाला तोड नाही. मी लहानपणापासून तिच्या एका सवयीचं निरीक्षण करत आलोय, रात्री स्वयंपाकघराच्या बेसीनमध्ये खरकटी भांडी ठेवलेली तिला चालत नाही. एखादा खरकटा चमचा राहिला तरी तिला झोप येत नाही. हीच सवय मलाही लागली आहे. मी इतकं तिच्यासारखं बोलतो, वागतो की, हळूहळू मी माझीन आई होऊ लागली आहे. तिचा चार पायांचा मुलगा सनी आणि माझ्याकडून तिला 'मदर्स डे'च्या शुभेच्छा!

– **अनिकेत सराफ**

## भूमिका बदलल्या

भारतात होते तेव्हा दररोज रात्री आई (सुकन्या मोने) मला विचारायची, 'तू दिवसभरात काय-काय केलंस?' तेव्हा मला प्रश्न पडायचा, मी दररोज वेगळं असं काय करते? हे जाणून घेण्यासाठी मी उत्सुक असते. आम्ही एकमेकांपासून दूर गेल्यानंतर आमच्या भूमिका काहीशा बदलल्या आहेत. एरवी माझा एक फोन गेला नाही तर ती काळजी करायची, आता हेच चित्र उलट झालं आहे. काही दिवसांपूर्वी आई एका दुर्गम भागात चित्रीकरण करत होती, तिथं तिला नेटवर्क नव्हतं. त्या दिवशी तिचा एकही फोन आला नाही, म्हणून मला चिंता वाटायला लागली मी आमच्या ड्रायवर दादांसह सगळ्यांना फोनाफोनी केली, तेव्हा आई चिंता करते म्हणजे काय असतं याची जाणीव झाली. तिचं माझ्याबरोबर असणं मी मिस करते, तिचा माझ्याभोवतीचा वावर मिस करते. आई एवढीच मामीही माझ्या जवळची आहे. प्रत्येक बाबतीत मामीची आठवण आल्याशिवाय राहत नाही.

– **जुलिया मोने**

## सूचनांचं महत्त्व आता जाणवतंय!

आईला (मंजिरी ओक) बोलायला, गप्पा मारायला प्रचंड आवडतं. मी लहान असल्यापासून ती माझ्याशी खूप गप्पा मारते. हीच तिची सवय मी मिस करतो. तिच्या हातचा रव्याचा शिरा अप्रतिम असतो. अनेकदा इथं तिच्यासारखा शिरा बनवण्याचा प्रयत्न केला, पण प्रत्येक वेळी तो सपशेल फसला. शेवटी, आईला सांगितलं की, तू जर्मनीला आलीस किंवा मी भारतात आलो तर तूच मला शिरा खायला घालत जा. पैशांची बचत केली पाहिजे, या तिच्या सूचनेचं आता महत्त्व पटतंय. इथं विशिष्ट रकमेत खर्च भागवताना तारांबळ उडते तेव्हा तिची शिकवण आठवते. परीक्षेच्या काळात घरातील सगळी कामं करून अभ्यास करणं थोडं अवघड होऊन जातं. अशा वेळी आईची उणीव भासते.

– **सार्थक ओक**

# आईसाठी भेटवस्तू भारी!

लहानपणी आपल्याला जे हवं ते मागण्यासाठी हक्काची व्यक्ती म्हणजे आई असते. कालांतरानं आईसाठी काही करण्याची इच्छा निर्माण होते आणि त्यातून तिला दिल्या गेलेल्या भेटवस्तू खास ठरतात. अशा काही खास गिफ्ट्सबद्दल कलाकार मंडळींनी उद्या असलेल्या 'मदर्स डे'च्या निमित्तानं 'मुंटा'शी शेअर केलं आहे. आपण आईसाठी काही करू शकतोय याचा आनंद आणि समाधान असल्याचं कलाकारांनी आवर्जून नमूद केलं.

## आईच्या हक्काचं घर

मी लहान असताना आम्ही मुंबईतून पुण्यात राहायला गेलो होतो त्यावेळी सुरुवातीला आईला माहेरची आठवण यायची. मला तेव्हा कळत नव्हतं की, तिला नक्की काय वाटतंय; पण मी तिला म्हणायचे, 'कितीही काहीही झालं ना तरी मी तुला मुंबईत घर घेऊन देईन!'. काही वर्षांनी मनोरंजनविश्वातील माझा प्रवास सुरू झाला. आम्ही दोघींनी एकत्र खूप चढ-उतार पाहिले. अखेर मुंबईतलं माझं पहिलं घर मी आईच्या नावावर केलं. घर म्हणजे माझ्या आईचं सर्वस्व आहे आणि आमच्या घराला ती फार अभिमानानं आणि प्रेमानं जपते. लहानपणी मी बोलले होते; ते मला पूर्ण करता आलं याचं समाधान वाटतं.

– **अमृता खानविलकर**

## पहिली परदेशवारी

माझ्या आईला परदेशाबद्दल फार आकर्षण असायचं. विमानप्रवास, बाहेरच्या देशातले लोक, त्यांचं विश्व याविषयी तिला नेहमी कुतूहल वाटायचं. काही महिन्यांपूर्वी मी, माझा भाऊ आणि ताई असं आम्ही मिळून आई-बाबांना पहिल्यांदा परदेश दौऱ्यावर पाठवलं. माझ्या शाळेतल्या पहिल्या सहलीला तिला जसा आनंद झाला असेल तसाच, किंबहुना त्यापेक्षा जास्त आनंद मला तिला या ट्रीपवर जाताना पाहून झाला. आता आपण आई-बाबांना फिरायला पाठवतोय, त्यांच्यासाठी काहीतरी करू शकतोय याचा खरंच खूप आनंद वाटतो.

– **सिद्धार्थ जाधव**

## सनरूफची सफर

दोन वर्षांपूर्वी आम्ही मोठी गाडी घेण्याचा निर्णय घेतला. संपूर्ण परिवाराला एकत्र प्रवास करता येईल अशी सेकान सीटर कार घेण्याचं ठरवलं. मी घरच्यांना नेमकी कुठली गाडी घेऊ असं विचारल्यावर आई निरागसपणे म्हणाली, 'मला तातलं फार काही कळत नाही; पण दोन गोष्टी लक्षात ठेव; एक चांगली दणकट घे आणि दुसरं म्हणजे त्याचं छत उघडलं पाहिजे'. मी स्वखर्चानं सनरूफ असलेली मोठी गाडी विकत घेतली. एक दिवस आम्ही सगळे फिरायला निघालो. मी गाडी चालवत होतो आणि आई नाजूला नसलेली. येताना गाडीचं सनरूफ उघडलं आणि आईनं सनरूफमधून आकाशातला चंद्र पाहिला. ती पटकन म्हणाली 'मला अशीच गाडी हवी होती!' त्या क्षणी मला ती गाडी घेतल्याचं खऱ्या अर्थानं समाधान मिळालं.

– **संकर्षण कऱ्हाडे**

## जपून ठेवलेल्या भेटवस्तू

मी कॉलेजमध्ये असताना 'मदर्स डे' साजरा करण्याचं आकर्षण होतं. तेव्हा शिक्षणासोबतच मी नोकरीदेखील करायचो आणि माझ्या कमाईतून तेव्हा मी आईला काँफीचा मग आणि आमच्या एका फोटोची फ्रेम करून भेट म्हणून दिली होती. आज त्या गोष्टीला इतकी वर्षं झाली; पण आईनं या दोन्ही गोष्टी अगदी नीट जपून ठेवल्या आहेत. त्यामुळे त्यावर्षीचा 'मदर्स डे' आणि त्या भेटवस्तू आम्हा दोघांसाठी खास आहेत.

– **भूषण प्रधान**

## आमची मॉल ट्रीप

मी आतापर्यंत आईला बऱ्याच भेटवस्तू दिल्या आहेत. पण त्यातली सगळ्यात खास भेट म्हणजे आमची 'मॉल ट्रीप'. मी एकदा आईला न सांगता मॉलमध्ये घेऊन गेले आणि तिला सांगितलं की, तुला आवडेल ते सगळं तू खरेदी कर. आई एकदम चकित झाली. तिला खूप आनंद झाला. सहसा आई स्वत:साठी काहीच घेत नाही. ती कायम आमचा विचार करत असते. पण त्यादिवशी मी तिला मनोसक्त खरेदी करू दिली. त्यावेळी तिनं तिच्यासाठी खूप कपडे घेतले. वेगवेगळे कपडे घेत असताना मला तिच्यात एक लहान मूल दिसत होतं. मी दिलेल्या त्या गिफ्टनं ती खूप खुश झाली होती.

– **पल्लवी पाटील**

## दागिन्यांची मौल्यवान भेट

खरं तर आपण आईला काय देणार? संपूर्ण आयुष्यचं तिनं आपल्याला दिलंय. पण दागिने तिच्या चेहऱ्यावर गोड हसू आणतात. तिला दागिने खूप आवडतात. त्यामुळे प्रत्येक 'मदर्स डे'ला आणि तिच्या वाढदिवसाला मी तिला एक दागिना भेट म्हणून देते. अर्थात ही खरेदी करताना आई स्वत:देखील दुकानात हजर असते आणि तिच्या आवडीचा दागिना मी तिला भेट देते. मी देवाकडे नेहमी हीच प्रार्थना करते की, मला एवढं सक्षम करव की, आईसाठी अशा अनेक गोष्टी कायम करता याव्यात.

– **श्रेया बुगडे**

## वर्षभर गिफ्ट्स देते

मी फक्त 'मदर्स डे' आहे म्हणून आईला कधीच कोणतं गिफ्ट दिलं नाहीय. विशिष्ट अशा एकाच दिवशी भेटवस्तू देणं मला आवडत नाही. माझ्यासाठी वर्षभर 'मदर्स डे' असतो. कारण काही माणसांवर आपण वर्षभर प्रेम करायलाच हवं. म्हणूनच मी आईला आवडेल ते नेहमी घेत असते. मग ती भेटवस्तू काहीही असो. अगदी एखादं घड्याळ, परफ्युम, साडी असं काहीही! तिच्या आवडीनुसार तिला सगळं घेऊन देते.

– **अभिज्ञा भावे**

संकलन : **सानिका म्हमकर, संपदा जोशी, उत्सवी पांचाळ**

रजि. नं. : एमएएनएमएआर/ २०१४ / ६०९३४ वर्ष : ९ अंक : १११

बेनेट, कोलमन ॲण्ड कंपनी लि.च्या वतीने आर. कृष्णमूर्ती यांनी टाइम्स ऑफ इंडिया इमारत, डॉ. डी. एन. रोड, मुंबई - ४०० ००१ येथे प्रकाशित केले व १) द टाइम्स ऑफ इंडिया सबर्बन प्रेस, वेस्टर्न एक्सप्रेस हायवेजवळ, आकुर्ली रोड, कांदिवली (पू.) मुंबई - ४०० १०१. २) द टाइम्स ऑफ इंडिया प्रिंट सिटी, प्लॉट नं. ४, टी.टी.सी. इंडस्ट्रीयल एरिया, ठाणे-बेलापूर रोड, ऐरोली, नवी मुंबई-४००७०८, फोन (०२२) २७६०९९९९, फॅक्स - (०२२) २७८०५२७५ येथे मुद्रित केले. **संपादक- पराग करंदीकर, निवासी संपादक - समीर कर्वे (मुंबई आवृत्ती)** (पीआरबी कायद्यानुसार बातम्यांच्या निवडीसाठी जबाबदार) सर्वाधिकार सुरक्षित. प्रकाशकांच्या लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशत: पुनर्प्रकाशनास पूर्णत: बंदी आहे.

Godrej Finance Limited
गोदरेज फायनान्स लिमिटेड
Godrej | FINANCE
गोदरेज | फायनान्स

सार्वजनिक सूचना

**'गोदरेज फायनान्स लिमिटेड' दवारे मास्टर डायरेक्शन - रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनी - स्केल बेस्ड रेग्युलेशन) निर्देश, २०२३ च्या परिच्छेद ४७ नुसार सार्वजनिक सूचना**

**गोदरेज फायनान्स लिमिटेड** ("कंपनी" किंवा "जीएफएल") ही कंपनी कायदा, १९५६ (कॉर्पोरेट आयडेंटिफिकेशन नंबर: यू६४२०७एमएच१९९२पीएलसी०८५४१७) अंतर्गत समाविष्ट केलेली एक पब्लिक लिमिटेड कंपनी आहे आणि भारतीय रिझर्व्ह बँक (सीओआर क्र.: १३.००३८८) मध्ये नॉन- डिपॉझिट, नॉन-बँकिंग वित्तीय कंपनी ("एनबीएफसी") नोंदणीकृत आहे. जीएफएलचे नोंदणीकृत कार्यालय गोदरेज हन, पिरोजशाह नगर, ईस्टर्न एक्सप्रेस हायवे, विक्रोली (पू). मुंबई - ४०००७९, महाराष्ट्र येथे आहे.

याद्वारे नोटीस दिली जात आहे की, कंपनी युनिट क्र. ८०१, ८०२, ८०३, ८०४ सेट्रम प्लॉट क्र. सी.ए. सरकार हॉटेलजवळ, रायला देवी तलाव, वागळे इस्टेट, ठाणे, महाराष्ट्र - ४००६०४ येथे स्थित शाखा कार्यालय ऑपरेशनल कारणांमुळे आता, कार्यालय क्र. २०१-ए, रा मजला, प्लॉट नं. बी-३, वायफाय आयटी पार्क, रस्ता क्र.१, वागळे इस्टेट, ठाणे - ४००६०४, महाराष्ट्र, येथे ही नोटीस जारी केल्याच्या तारखेपासून ३ महिन्यांच्या कालावधीत स्थलांतरित करण्यात येणार आहे. सदर परिसरातील कार्यालय बँक-ऑफिस म्हणून सुरू ठेवले जाईल.

ग्राहकांच्या सर्व शंका customercare@godrejcapital.com या इमेल आयडीवर संबंधित केल्या जातील.

या संदर्भातील कोणतेही स्पष्टीकरण किंवा चौकशी ही कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात या नोटीसच्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांच्या कालावधीत मुख्य वित्तीय अधिकारी श्री. कुणाल कर्नानी, यांना किंवा gfl.compliance@godrejfinance.com या इमेल आयडीवर संबंधित केलो जाईल.

एसडी/-
**गोदरेज फायनान्स लिमिटेडच्या वतीने**

स्थळ: ठाणे
दिनांक: 10/05/2024

Godrej Housing Finance Limited
गोदरेज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड
Godrej | HOUSING FINANCE
गोदरेज|हाऊसिंग फायनान्स

सार्वजनिक सूचना

**'गोदरेज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड' दवारे मास्टर डायरेक्शन - नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनी - हाऊसिंग फायनान्स कंपनी (रिझर्व्ह बँक) निर्देश, २०२१ च्या परिच्छेद ५७ नुसार सार्वजनिक सूचना**

**गोदरेज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** ("कंपनी" किंवा "जीएचएफ") ही कंपनी कायदा, २०१३ (कॉर्पोरेट ओळख क्रमांक: यू ६५१००एमएच२०१८पीएलसी३१३७९) अंतर्गत समाविष्ट केलेली एक पब्लिक लिमिटेड कंपनी आहे आणि भारतीय रिझर्व्ह बँक (सीओआर. क्र.: सी.ओ.आर.-००१८४) मध्ये नॉन-डिपॉझिट घेताना नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनी-हाऊसिंग फायनान्स कंपनी ("एनबीएफसी-एचएफसी") म्हणून नोंदणीकृत आहे. जीएचएफचाचे नोंदणीकृत कार्यालय गोदरेज हन, पिरोजशाह नगर, ईस्टर्न एक्सप्रेस हायवे, विक्रोळी (पू). मुंबई, महाराष्ट्र - ४०००७९ येथे आहे.

याद्वारे नोटीस दिली जात आहे की, कंपनी युनिट क्र. ८०१, ८०२, ८०३, ८०४ सेट्रम प्लॉट क्र. सी.ए. सरकार हॉटेलजवळ, रायला देवी तलाव, वागळे इस्टेट, ठाणे, महाराष्ट्र - ४००६०४ येथे स्थित शाखा कार्यालय ऑपरेशनल कारणांमुळे आता, कार्यालय क्र. २०१-ए, रा मजला, प्लॉट नं. बी-३, वायफाय आयटी पार्क, रस्ता क्र.१, वागळे इस्टेट, ठाणे - ४००६०४, महाराष्ट्र, येथे ही नोटीस जारी केल्याच्या तारखेपासून ३ महिन्यांच्या कालावधीत स्थलांतरित करण्यात येणार आहे. सदर परिसरातील कार्यालय बँक-ऑफिस म्हणून सुरू ठेवले जाईल.

ग्राहकांच्या सर्व शंका customercare@godrejcapital.com या इमेल आयडीवर संबंधित केल्या जातील.

या संदर्भातील कोणतेही स्पष्टीकरण किंवा चौकशी ही कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात या नोटीसच्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत मुख्य अनुपालन अधिकारी, श्री योगेश जैन यांच्या नोंदणीकृत कार्यालयात किंवा compliance@godrejhf.com या इमेल आयडीवर संबंधित केली जाईल.

एसडी/-
**गोदरेज हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या वतीने**

स्थळ: ठाणे
दिनांक: 10/05/2024